ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - X, Issue - XX, Vol. - II
Impact Factor 6.20 (GRIFI)
July 2019 To Dec. 2019

## JAIKRANTI ARTS AND COMMERCE SENIOR COLLEGE
## ICSSR SPONSORED

TWO DAY NATIONAL SEMINAR

ON

## "Recent Economic Reforms & Its Impact on Industrial Development in India"

(20th - 21st Sept. 2019)

Editor in Chief
Dr. Avinash V. Pawar

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

RNI MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. II, July 2019 To Dec. 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | स्वच्छ भारत अभियान काळाची गरज<br>**डॉ. एम.डी. कच्छवे** | 1 |
| 2 | भारतीय अर्थव्यवस्थेतील रोखरहित व्यवहारांची उपयुक्तता एक अभ्यास<br>**सागर शरद कुलकर्णी** | 6 |
| 3 | भारतातील आर्थिक सुधारणा - एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. अनंत नरवडे** | 12 |
| 4 | जी.एस.टी. धारणा आणि सुधारणा<br>**गायत्री लक्ष्मण गायकवाड** | 19 |
| 5 | भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर वस्तू आणि सेवा कराचा परिणाम<br>**डॉ. संजय मारोती मुंडकर** | 24 |
| 6 | भारतातील नवीन आर्थिक सुधारणा<br>**डॉ. राजश्री आप्पाराव जाधव** | 28 |
| 7 | मेक इन इंडिया व औद्योगिक विकास<br>**डॉ.डी.पी. कांबळे, डॉ. मनोजकुमार सोमवंशी** | 33 |
| 8 | भारतातील आर्थिक सुधारणा : काल, आज आणि उद्या<br>**डॉ. लता कमलापुरे** | 36 |
| 9 | एक झेप : भारतात आणि औद्योगिक विकासाच्या दिशेने<br>**अक्षय कमलाकर पवार** | 45 |
| 10 | आर्थिक धोरणानंतर भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार आणि धोरण<br>**डॉ. शिवराज रामराव पाटील** | 52 |
| 11 | भारतातील औद्योगिक विकास आणि आर्थिक सुधारणा<br>**डॉ. अनिल दि. वाडकर** | 58 |
| 12 | मेक इन इंडिया : एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे** | 65 |
| 13 | लघु आणि मध्यम उद्योगांवर वस्तू व सेवाकराचा परिणाम<br>**डॉ. गजानन भा. पाटील** | 69 |
| 14 | समावेशक विकासासाठी कौशल्य विकास<br>**डॉ. शिवाजी पाते** | 79 |
| 15 | भारतातील आर्थिक सुधारणांचा भारतीय व्यापारशेष व रोजगारावर पडलेल्या परिणामांचा अभ्यास<br>**डॉ. बी.एस. सावके** | 87 |
| 16 | जी.एस.टी. चे औद्योगिक क्षेत्रावरती झालेले परिणाम<br>**रविकुमार चंद्रकांत माने** | 92 |

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. II, July 2019 To Dec. 2019 1

# स्वच्छ भारत अभियान काळाची गरज

**डॉ. एम.डी. कच्छवे**
वाणिज्य विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

1 Research Paper - Commerece

**प्रस्तावना (Introduction) :**

'स्वच्छता' हा माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्या स्वच्छतेविषयी आपण जागरूक राहून कार्य केल्यास आपली छाप इतरावर निश्चितपणे पडते. लहानपणी लागलेली स्वच्छतेची सवय त्याच्या सोबत आयुष्यभर राहते. म्हणून मानवी जीवनात स्वच्छतेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. 'स्वच्छता' ही समाज निर्मितीमधील एक महत्वपूर्ण घटक आहे. भारतातील समाज निरोगी व कार्यक्षम असण्यासाठी स्वच्छता विषयक समाज प्रबोधन अत्यंत आवश्यक आहे.

देशातील सर्व शहरामधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे म्हणून केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशात राबविणे सुरू केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ, सुंदर व पर्यावरणयुक्त देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात हे अभियान राबविण्यास सुरूवात झाली आहे. घर स्वच्छ राहिल्यास गाव स्वच्छ राहील आणि गाव स्वच्छ राहिल्यास राज्य स्वच्छ राहील. पर्यायाने देश स्वच्छ राहील. स्वच्छतेमुळे देशाचे आरोग्यही स्वच्छ राहण्यास मदत होईल. म्हणून नागरी भागात स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्यास सुरूवात होणार आहे. यापूर्वीच महाराष्ट्रात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून यादृष्टीने व्यापक प्रयत्न करण्यात आले आहेत. जागतिक शौचालय दिवस (World Toilet Day) १९ नोव्हेंबरला मानला जातो. हा दिवस २००१ पासून मानला जात आहे.

महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार पाच कोटी नागरी लोकसंख्या आहे. त्यापैकी २९ टक्के कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. शौचालयाची घरी सुविधा नसल्यामुळे ७३ टक्के कुटुंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत आहेत. २७ टक्के कुटुंब उघड्यावर शौचालयास जात आहेत. स्वच्छतेच्या या चळवळीचे नेतृत्व करताना जनतेने महात्मा गांधीचे स्वच्छ व निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करावे असे जनतेला आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. देशाचे पंतप्रधान

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani



स्वतः हाती झाडू घेऊन दिल्लीतील मंदीर मार्ग, पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ केला. रस्त्यावर लोकांनी घाण करू नये, इतरांना त्यापासून परावृत्त करावे. असे आवाहन त्यांनी केले. देशातील जनतेला पंतप्रधानानी 'ना गंदगी करेंगे, ना करने देंगे' चा मंत्र दिला. जनतेच्या सहभागामुळे स्वच्छ भारत अभियानाचे रूपांतर एका राष्ट्रीय चळवळीत झाले. त्यामुळे लोकांत जबाबदारीची भावना निर्माण झाली. पंतप्रधानानी वाराणसीमध्ये स्वच्छता मोहीम राबविली. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत त्यांनी गंगा नदीच्या अस्सी घाटावर अभियानाची सुरूवात केली. स्थानिक लोक मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. सरकारी कर्मचारी, लष्करी जवान, सिने कलाकार, खेळाडू, उद्योजक या कार्यासाठी पुढे सरसावले. संगीत, नाट्य, पथनाट्याच्या माध्यमातून देशभरात स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. लोकांच्या प्रतिसादामुळे स्वच्छ भारत अभियानाला जनचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

**संशोधनाचे उद्देश :**

संशोधनाचे खालीलप्रमाणे उद्देश निश्चित करण्यात आलेले आहेत.

१. स्वच्छतेची गरज अभ्यासणे.
२. स्वच्छतेचे महत्व जाणून घेणे.
३. स्वच्छ भारत अभियान या चळवळीचे उद्देश शोधणे.
४. निष्कर्ष काढणे.

**गृहीतके :**

सदर शोधनिंबधाची खालीलप्रमाणे गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

१. ग्रामीण भागात अजूनही शौचालयाचा वापर करीत नाहीत.
२. स्वच्छ भारत अभियानामुळे ७० टक्के जनता शौचालयाचा वापर करत आहे.
३. अस्वच्छतेमुळे मानवाचे आरोग्य बिघडते.

**अभ्यास पद्धती :**

सदर शोध निंबधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील अग्रलेख, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करून निश्चित उद्देशानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**स्वच्छ भारत मोहीम :**

भारत सरकारने संपूर्ण स्वच्छता अभियान १९९९ मध्ये सुरू केले. त्यानंतर पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी त्याचे नामकरण करून 'निर्मल भारत अभियान' असे नामकरण केले. २ ऑक्टोबर, २०१४ रोजी महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने स्वच्छ भारत मोहीम राबविण्याचे जाहीर केले. स्वच्छ भारत मोहीम सुरु झाल्यानंतर या टप्प्यावर या मोहीमेला आता चांगलीच चालना

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



मिळाली असून उल्लेखनीय प्रगती झाली आहे. लाल किल्ल्यावरून ऑक्टोबर, २०१४ मध्ये ही मोहीम सुरू करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या भावना व्यक्त केल्या. या मोहीमेला आता हळूहळू लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. देशातील ग्रामीण भागात स्वच्छतेच्या सोयी-सुविधा पोहचविण्याच्या प्रमाणात ४२ टक्क्यावरून ६३ टक्के इतकी वाढ झाली आहे. उघड्यावर शौचाला बसणाऱ्या लोकांच्या संख्येत ५५० दशलक्ष वरून ३५० दशलक्ष इतकी घट झाली आहे.

स्वच्छतेला महत्व देणे हे अत्यंत महत्वाचे आहे. अस्वच्छतेमुळे पाच वर्षाखालील मुलामध्ये जुलाबाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे त्यांची वाढ खुंटणे किंवा बालमृत्यू होतात. महिलांची सुरक्षितता आणि प्रतिष्ठा यांच्यादृष्टीनेही स्वच्छता फार महत्वाची आहे. स्वच्छ भारत मोहीम ही लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणणारी एक सामूहिक चळवळ आहे. वर्षानुवर्षे उघड्यावर शौचाला बसायची सवय बदलून त्यांना शौचालयाचा वापर करायला शिकवणे प्रसारमाध्यमांकडून याविषयी जनजागृती मोहीम राबविली जात आहे. परंतु तळागाळापर्यंत ग्रामीण भागात जाऊन तेथील लोकांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन आणि प्रेरणा देण्याचे काम अत्यंत महत्वाचे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक ग्रामीण भागात विशेष शिबिराच्यावेळी प्रत्यक्षात त्यांना भेटून शौचालयाचे महत्व पटवून देतात. गुडमार्निंग पथकही पंचायत समितीकडून पहाटेच्यावेळी जाते.

स्वच्छ भारत मोहीमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारचे पेयजल व स्वच्छता मंत्रालय विविध उपक्रमांविषयी राज्यांना मदत करते. राष्ट्रीय व राज्य पातळीवर नियमितपणे अनेक कार्यशाळांचे आयोजन केले जाते. सुवर्ण मंदिर, तिरूपती मंदीर यासारख्या पवित्र स्थळांची स्वच्छता आंतरराष्ट्रीय मानकानुसार केली जाते. गंगेच्या स्वच्छतेबरोबरच तिच्याशी संबंधीत असलेल्या ग्रामपंचायतीची देखील स्वच्छता केली जाते. सुका आणि ओल्या कचऱ्याने परिणामकारक व्यवस्थापन करणे हा देखील एक महत्वाचे भाग आहे.

महाराष्ट्र स्वच्छ अभियांनातर्गत विविध नगरपालीकांमध्ये अतिशय उत्साहाने अभियान राबविण्यात येत आहेत. यामध्ये लोकसहभाग मोठ्या प्रमाणावर घेतला जात आहे. त्यामुळे अनेक शहरे, गावे कचरामुक्त आणि हागणदारीमुक्त झाली आहेत. देशातील सर्व नागरिकांना स्वच्छ पर्यावरण आणि चांगले आरोग्य मिळावे म्हणून स्वच्छ सुंदर आणि पर्यावरण युक्त देशाचे स्वप्न २ ऑक्टोबर २०१९ पूर्वी साकारण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत स्वच्छता अभियानाचा बोलबाला सुरू आहे. महाराष्ट्रात १५ जिल्हे, १६३ तालुके आणि २६ हजार गावे आतापर्यंत जागणदारीमुक्त झाली आहेत. बहुतांश आजार हे अशुद्ध पाणी, अस्वच्छ परिसर, वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव यामुळे होतात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देतानाच त्यांच्यात एकसंधपणाची भावना निर्माण करणे आणि त्यातून गावाचा सर्वागिण विकास साधण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवात झाली. शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी, घर

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



परिसराची स्वच्छता, सांडपाण्याचे योग्य नियोजन, व्यक्तिगत स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापन, मानवी मलमूत्राची विल्हेवाट अशा गोष्टीमध्ये लोक सहभागातून काम करुन ग्रामस्थांनी आपला व आपल्या गावाची कायापालट केला.

**स्वच्छ भारत अभियानाचे उद्देश :**

१ उघड्यावरील शौचविधी बंद करणे.

२ नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक व शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब करणे.

३ स्वच्छतेच्या चांगल्या पद्धतीच्या अनुसंगाने सवयीमध्ये बदल करणे.

३ स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्याची सार्वजनिक आरोग्याशी सांगड घालणे.

४ घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्थितीत सुधारणा करणे.

५ शहरी भागातील बांधकामावर काम करणाऱ्या कामगारांना तेथेच तात्पुरत्या शौचालयाची सुविधा उपलब्ध करण्याचे अनिवार्य करणे.

६ स्वच्छतेचा व्यापक आराखडा तयार करणे.

मानवास चांगले जीवन जगण्यासाठी हवा, पाणी, अन्न, निवारा, सूर्यप्रकाश यांची गरज असते. शुद्धपाण्याचा पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, उघड्यावर शौचास जाणे, टाकाऊ पदार्थांचे वेळीच निर्मुलन करणे, योग्य पर्यावरण नियोजन करणे इत्यादी बाबीकडे समाजातील सर्व घटकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी जनजागृतीचे लोकचळवळीत रूपांतर होणे काळाची गरज आहे. ग्रामीण जीवनाचे आधुनिकीकरण करण्यासाठी आरोग्याचे नियम लक्षात घेऊन योजनाबद्धरितीने गृह रचना करणे आवश्यक आहे. चांगली घरे आरोग्य व स्वच्छता यांना भरून असलेल्या सांडपाणी, मैला विसर्जनाच्या सोयी, बंद गटारे, शुद्धपाणी, चांगले रस्ते, शिक्षण इत्यादी उच्च दर्जाच्या सुविधा ग्रामीण भागातील लोकांना मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण जनतेला आरोग्याचे महत्व पटवून देण्यासाठी, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाकडून ग्रामीण भागात जास्तीत जास्त व वेगवेगळे उपक्रम राबविले आहे. जगातील ज्या देशात पाण्याचा वापर मलमूत्र वाहून नेण्यासाठी केला जातो अशा देशातील ९० टक्के मलमुत्र तसेच सांडपाण्यावर कुठलीही प्रक्रिया न करता शहराजवळच्या किंवा गावाजवळच्या नादीनाले, तलाव यामध्ये सोडले जाते. यामुळे आणि जमीनीतील पाणी प्रदूषित होते. तसेच सार्वजनिक आरोग्य व पर्यावरणाला धोका निर्माण होतो. लहान, मोठ्या कारखान्यातून निघणाऱ्या विषारी पाण्यामुळे जमीन खराब होते व पाणी प्रदुषित होते. मानवी विष्ठेमध्ये आरोग्यास घातक असणारे जे जिवाणू असतात त्याचा परिणाम शेतीमधील पिकावर होवू शकतो. तसेच आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते.

'अस्वच्छता' मग ती वैयक्तिक असो अथवा सार्वजनिक स्वरूपाची असो तिचे दुष्परिणाम

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. II, July 2019 To Dec. 2019 

अतिशय गंभीर असतात. शौचालयाची सोय नसल्यास संपूर्ण गावाचा परिसर दुर्गंधीचा होतो. म्हणून मानवी जीवनात व्यक्तीने स्वच्छतेला महत्व देणे काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने ग्राम स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता व वैयक्तिक स्वच्छतेला महत्व देणे महत्वाचे आहे.

**निष्कर्ष :**

भारत हा कृषिप्रधान व खेड्यांनी मिळून बनलेला देश आहे. जोपर्यंत देशातील खेडे, वाड्या, तांडे सुधारणार नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने राष्ट्राचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणात अस्वच्छता, निरक्षरता असल्याचे दिसून येते. ग्रामीण परिसर प्रामुख्याने उघड्यावरील शौच विधीमुळे सर्वाधिक प्रदुषित होतो त्याचे आरोग्यावर अनिष्ठ व आयुष्यभर भोगावे लागणारे परिणाम होतात. शौचालय वापराचे महत्व ग्रामीण जनतेला पटवून देणे आवश्यक आहे. शौचालयाचे निव्वळ बांधकाम करून चालणार नाही तर त्याचा वापरही होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात चिकनगुणीया, विषमज्वर, हिवताप, कावीळ, हगवण इत्यादी रोग मानवी विष्ठा, अस्वच्छ परिसर, प्रदुषित पाणी यामुळे उदभवतात.

पंतप्रधानाचे नेतृत्व, राज्या-राज्यातील राजकीय नेत्यांचा पाठिंबा प्रशासकीय कर्मचारी, तळागाळातील सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचविणारे सरपंचासारखे नेते (महिला सरपंच) यासर्वांच्या सहकार्याने देशात स्वच्छ भारत मोहीम लोकचळवळ होण्यास वेळ लागणार नाही. लोकांच्या प्रतिसादामुळे स्वच्छ भारत अभियानाला जनचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. लोकांनी सक्रिय सहभाग नोंदवत स्वच्छ व निटनेटक्या भारताची शपथ घेतली. रस्ते साफ करणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, शौचालयाची स्वच्छता व निरोगी वातावरण यासाठी हाती झाडू घेणे हा स्वच्छ भारत अभियानाचा भाग बनला आहे.

## संदर्भ सूची :-


१. परमेश्वरन अय्यर : 'स्वच्छ भारत मोहीम जबाबदारी प्रत्येकाची योजना', मे २०१७.

२. टीम लोकराज्य आणि डॉ. किरण मोघे : 'शहरे स्वच्छ होत आहेत', लोकराज्य, फेब्रुवारी, २०१६.

३. संजय बापट : 'स्वच्छता अभियान : एक उरकण्याचा विधी', दै. लोकसत्ता, दि. १ ऑक्टोबर, २०१७.

४. दै. प्रहार संपादकीय, 'मोदींचे स्वच्छता अभियान फार्स वाटतो का?'

५. महेंद्र दानले : 'स्वच्छता आणि सौंदर्य', दै. लोकसत्ता संपादकीय, दि. २० जून, २०१५


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani